तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स : २२६९२१०२/२२६९०००७.

तार - EDUTECH E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएम/२००७/शा २२०७

दिनांक : 18 OCT 2007

प्रति,

सर्व सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई , पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती , नागपूर

विषय : जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यास मुदतवाढ

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम २००७/ (३७५/०७) / तांशि-१, दिनाक १८.१०.२००७

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये एमबीए/एमएमएस, एमसीए हे पदव्युत्तर पदवी आणि अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र,हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, पदवी अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र पडताळणीची दिनांक १५.१०.२००७ पर्यंत दिलेली मुदतवाढ दिनांक १५.०१.२००८ पर्यंत वाढवून देण्यात आलेली आहे. आपल्या अधिनस्त उपरोक्त सर्व अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांना या मुदतवाढीबाबत कळविण्यात यावे. तसेच दिनांक १५/१०/२००७ पर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले असतील तर त्यांचेही प्रवेश १५/०१/२००८ पर्यंत किंवा पुढील आदेश होईपर्यंत रद्द करण्यात येऊ नयेत असेही संस्थांना कळविण्यात यावे.

(प्रा.न.बा.पाटलकर)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीसाठी सादर

माहिती तंत्रज्ञान कक्ष, मुख्य कार्यालय मुंबई , त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त बाब संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.